# पंढरी संचार

• पंढरपूर • शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५
• किंमत ₹ ४ • पाने : ८

NO PAIDNEWS

pandharisanchar.com

RNI-MAH-MAR/1499/2000 • वर्ष २९ • अंक - २५८




राजसाहेब मंत्रालयाचा सहावा मजला खुणावतोय पण थोडी वाट पहा ! PII



आरोग्य व स्वच्छतेच्या सोयी सुविधा उपलब्ध करुन द्या -मुख्याधिकारी PIII

# दादांचा रौद्रावतार!

## सुव्यवस्थेची जबाबदारी पोलिसांची: कोयता गँगवर ही भाष्य

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पोलीस आयुक्तालयाच्या भूमिपूजन समारंभात आज ना. अजितदादा पवार यांनी आपला रौद्र अवतार दाखवला. कायदा आणि सुव्यवस्था राखण करण्याची तसेच ती अबाधित ठेवण्याची जबाबदारी ही पोलिसांची आहे. त्यामुळे पुण्यामध्ये एवढे गुन्हे घडतातच कसे? असा सवाल त्यांनी केला. कोण कुठली कोयता गँग ? कुठून आली, काय करते? त्याचे एवढे कसे प्रस्थ वाढले अशा प्रश्नांची सरबत्ती करत त्यांनी पोलिसांना याबाबत कडक कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

अशा लोकांना मकोका लावा, काय वाटेल ते लावा, कुठलेही कलमे लावा परंतु शासन करा त्यांच्यावरती कठोर कारवाई करा असे ते म्हणाले.

इतकेच नव्हे तर अशा गुन्हेगाराची धिंड काढून त्यांच्यावर जरब बसवा असेही आदेश पोलिसांना दिले.

दादा म्हणाले की, मी मुख्यमंत्र्यांसमोरच सांगतो की अशा गुन्हेगारांना अजिबात दयामाया दाखवू नका. इतर समाजावर त्याचा धाक बसला पाहिजे. दहशत बसली पाहिजे. यासाठी त्यांची धिंड काढा. काहीही करा परंतु ही गुन्हेगारी तातडीने थांबवा.

याच कार्यक्रमात शिट्या मारणाऱ्या काही नागरिकांचाही त्यांनी समाचार घेतला . तुम्हाला काही शिस्त वगैरे प्रकार आहे की नाही, असे सांगत » पान ३ वर



पुणे न्याय आणि सुरक्षेसाठी अढळ निर्धार!: 'निबे लिमिटेड' वर्धापन दिन व अत्याधुनिक क्षेपणास्त्र संकुल, लघु शस्त्रास्त्र निर्मिती सुविधेची पाहणी करताना...

### महायुतीच्या चांगल्या बातम्या द्या नाहीतर...

- देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी एके 47 रायफल ची पाहनी करताना ती रायफल माध्यमांच्या प्रतिनिधीकडे रोखत मिश्किल टिप्पणी केली.
- दादा म्हणाले , महायुतीच्या चांगल्या बातम्या द्या नाहीतर आम्ही दोघेजण तुम्हाला उडवून टाकू. या विनोदावर सर्वांनी हसून दाद दिली

### तुम्हाला शिस्त नावाचा काही प्रकार आहे का ?

- कार्यक्रम सुरू होत असताना काही हौशी आणि उत्साही नागरिकांनी शिट्या वाजवल्या त्यावर अजित दादा यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. मुख्यमंत्री व्यासपीठावर असताना शिट्र्या काय वाजवता ? हा शिट्या वाजवण्याचा कार्यक्रम आहे का ? तुम्हाला शिस्त नावाचा काही प्रकार आहे का ? अशा प्रश्नांची सरबत्ती करत त्यांनी , पोलिसांकडून उचलून आणण्याचा इशारा दिला.

# मुख्यमंत्री फडणवीस आज सोलापूर दौऱ्यावर


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच सोलापूर दौऱ्यावर येत आहेत. आज ७ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापुरात येणार असून यावेळी राजकीय घडामोडी घडण्याचे संकेत मिळत आहेत. यामुळे भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यात उत्साहाचे वातावरण पसरले आहे. सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचा बालेकिल्ला होता. मात्र नेत्यांमधील अंतर्गत मतभेदामुळे जिल्ह्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेसची ताकद कमी झाली. सोलापूर जिल्ह्याकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लक्ष केंद्रित केले होते. यामुळे गेल्या दहा वर्षात सोलापूर जिल्ह्यात भाजपची ताकद वाढली आहे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापूर जिल्ह्यात आले होते. मात्र लोकसभा निवडणुकीत माढा व सोलापूर लोकसभा मतदारसंघातील भाजपच्या उमेदवारांचा पराभव झाला. यानंतर विधानसभा निवडणूक प्रचारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापूर जिल्ह्याकडे फिरकले नाहीत. यामुळे फडणवीस यांनी जिल्ह्याकडे दुर्लक्ष केले असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत होती. विधानसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला शासनाला चांगले यश मिळाले. मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली. गेल्या सहा महिन्यापासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हा दौरा केला नाही. मात्र ७ फेब्रुवारी रोजी सोलापुरात दिगंबर जैन समाजाचे राष्ट्रीय अधिवेशन असल्याने या अधिवेशनाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात » पान ३ वर

## » At a Glance

### दहा लाख रुपये आण म्हणून विवाहितेचा छळ



**सोलापूर :** हॉटेल व्यवसाय करण्यासाठी माहेरून दहा लाख रुपये घेऊन ये असे म्हणत विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी सासरच्या सहा जणांवर जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी सायमा मोहिद्दीन अत्तार (वय 23 राहणार मुक्तेश्वर नगर, मित्र नगर, शेळगी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार पती मोहिद्दीन अत्तार, सासू शाबेरा, सासरा मुबारक, पतीचा काका दिलावर अत्तार, काकू हसीना अत्तार, पतीची मावशी सहारा अत्तार ( सर्व राहणार मोरवाडी, पिंपरी चिंचवड पुणे ) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

### दोन चोरट्यांवर गुन्हा दाखल



**सोलापूर :** वळसंग पोलिसांनी दोन चोरट्यांवर गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी लताबाई शंकर स्वामी (वय 49 रा. कुंभारी तालुका दक्षिण सोलापूर ) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मल्लिकार्जुन लिंगाप्पा भंडारी ( वय 40, एमआयडीसी रोड माळीनगर ) व रशीद शेख ( वय 45, रा. शंकर मंदिरासमोर, कुंभारी ) या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोघांनी 28 ते 29 जानेवारी दरम्यान लताबाई यांच्या घराचे कुलूप तोडून सोने, चांदीचे दागिने, एचपी गॅस कंपनीची टाकी, साड्या असा एकूण 89 हजार 230 रुपयांचा ऐवज चोरून नेला होता.

### भीषण अपघातात दोन मजूर ठार



**सांगोला :** डाळिंब वाहतूक करणारी पिकअप जीप व टेम्पोच्या भीषण अपघातात दोन ऊसतोड कामगार ठार झाले, तर नऊ कामगार जखमी झाले आहेत. बाबूराव महादेव गोडसे (वय ४२) व एकनाथ सोपान गडदे (५३, दोघेही रा. गौडवाडी, ता. सांगोला) अशी मृतांची नावे आहेत. सुजाता आलदर (३५), रेश्मा ऐवळे (३०), विमल भारत कांबळे (५५), दामू राजाराम शिंगाडे (६०), मैनुद्दीन गुलाब मुलानी (७०), गोरख लिंगू सरगर, हर्षद हनुमंत काटे (१८) हनुमंत श्रीरंग काटे (७०), भारत विष्णू कांबळे (६५), गणपत दत्तू आलदर (५०, सर्वजण रा. गौडवाडी, ता. सांगोला) अशी जखमींची नावे आहेत.

### बार्शीत महिलेची ५२ हजारांची ऑनलाईन फसवणूक

**बार्शी :** बार्शी शहरातील राऊळ गल्ली येथे राहणाऱ्या एका 48 वर्षीय महिलेची तब्बल 52, 000 रुपये ऑनलाईन फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. मोबाईल हॅक करून पैसे दुसऱ्या खात्यावर ट्रान्सफर करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या घटनेने नागरिकांमध्ये ऑनलाईन फसवणुकीबाबत मोठी चिंता निर्माण केली आहे. पोलिसांनी सर्व नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

### सीना नदीत बुडून परराज्यातील दोघांचा मृत्यू



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** आंघोळीसाठी सीना नदीच्या पात्रात गेलेल्या परराज्यातील दोघा मुलांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना सोलापूर जिल्ह्यातील बोपले (ता. मोहोळ) येथे काल उघडकीस आली आहे. शंकर बिरनवार (वय 19) व सत्यम गईगई (वय 15) अशी त्या दोघांची नावे आहेत. दोघेही मध्य प्रदेशातील पाथरी (बालाघाट) येथील रहिवासी आहेत. बांधकामावर मोलमजुरी करण्यासाठी आपल्या कुटुंबासोबत ते मोहोळ तालुक्यात राहत होते. घटनेचा अधिक तपास मोहोळ पोलीस स्टेशनचे अधिकारी करीत आहेत.

# माघी यात्रेसाठी विठ्ठलाचा प्रसाद; ६ लाख लाडू तयार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



*__पंढरपूर :__ माघी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी तीन लाखाहून अधिक भाविक दाखल होणार असल्याचा अंदाज प्रशासनाकडून व्यक्त करण्यात येत आहे. आलेल्या भाविकांना विठ्ठलाचा प्रसाद बुंदीचा लाडू मिळावा म्हणून विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीकडून 6 लाख लाडू तयार करण्यात आले आहेत. विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलेले भाविक पंढरपुरातून पेढे, चिरमुरे, बत्तासे बरोबरच विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने तयार केलेला विठ्ठलाचा प्रसाद बुंदीचा लाडू खरेदी करतात. यामुळे मंदिर समितीकडून गेल्या दोन दिवसापासून बुंदीचे लाडू तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. 80 पुरुष व महिला कर्मचारी लाडू तयार करीत आहे. दिवसाला 50 हजार लाडू तयार करण्यात येत आहेत. यात्रा कालावधीत सहा लाख लाडूची विक्री करण्यात येणार आहे. तसेच एक लाख राजगिरा लाडूची विक्री करण्यात येणार आहे. यासाठी मंदिर परिसरात लाडू विक्रीचे स्टॉल्स उभा करण्यात आले आहेत. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीने तयार केलेल्या विठ्ठलाच्या प्रसादास भाविकांकडून चांगली मागणी येत असल्याचे दिसून येत आहे.*

# माघी यात्रेसाठी 400 एसटी बसेस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** माघी यात्रेत विठ्ठलाच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात यामुळे येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाने ४०० एसटी बसेस सोडल्या आहेत. यामुळे भाविकांची सोय झाली असल्याने भाविकातून समाधान व्यक्त होत आहे.

माघी एकादशी सोहळा शनिवार ८ फेब्रुवारी रोजी साजरा होणार आहे. यासाठी विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी राज्यभरातून भाविक पंढरपुरात दाखल होऊ लागले आहेत. भाविकांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाने ४०० जादा एसटी बसेस सोडल्या आहेत. परिवहन महामंडळाकडून महिलांना व ६५ वर्षावरील नागरिकांना तिकीट दरात ५० टक्के सवलत तर ७५ वर्षांपूर्वी भाविकांना मोफत एसटीचा प्रवास योजना सुरू केली आहे. यामुळे एसटीकडे अनेक भाविक वळले आहेत. भाविकांना सोयी सुविधा देण्यासाठी पंढरपूर बस स्थानकात नियोजन करण्यात आले आहे. ५० भाविक एकत्र आल्यास भाविकांना खास एसटी बसेस देण्यात येत आहे. » पान ३ वर

# नगरपरिषदेच्या अर्थसंकल्पाकडे नागरिकांचे लक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** केंद्रीय अर्थसंकल्प नुकताच सादर करण्यात आला आहे. लवकरच राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. यानंतर २८ फेब्रुवारी रोजी पंढरपूर नगर परिषदेचा अर्थसंकल्प सादर होणार आहे. या अर्थसंकल्पाकडे पंढरपूरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

गेल्या तीन वर्षापासून पंढरपूर नगरपरिषदेवर प्रशासक काम करत आहे. यामुळे गेल्या तीन वर्षात म्हणावी तशी करवाढ करण्यात आली नाही. पंढरपूर नगर परिषदेचा अर्थसंकल्प १७५ कोटी पेक्षा अधिक असतो. पंढरपूर राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी वर्षाला एक कोटीहून अधिक भाविक येतात. यामुळे पंढरपूरच्या विकासासाठी शासन कोट्यावधी रुपयाचा निधी देते. तसेच नगरपरिषदेला विविध विकास कामे करण्यासाठी निधी देते. पंढरपूर नगरपरिषद भाविक व नागरिकांना सोयी सुविधा देते.

यासाठी कोट्यावधी रुपयाचा खर्च येतो. तसेच नागरिकाकडून विविध प्रकारचा कर गोळा केला जातो. वर्षाला नगर परिषदेची आर्थिक उलाढाल १७५ कोटी पेक्षा अधिक असते. प्रत्येक वर्षी नगरपरिषदेचा अर्थसंकल्प सादर केला जातो. यामध्ये करात व विविध प्रकारचे दाखले सुविधेवर कर आकारणी केली जाते. लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. यामुळे आगामी नगर परिषदेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून यंदाच्या वर्षी करात कोणतीही वाढ होणार नसल्याची चर्चा नागरिकांतून होत आहे. २८ फेब्रुवारी रोजी पंढरपूर नगरपरिषदेचा अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे. या अर्थसंकल्पाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.